Vol 2 Issue 6 July 2012

ISSN No : 2230-7850

## International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

*International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

*Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 6, July 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*अनिल माणिकराव बैसाणे*

इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

**प्रस्तावना :**

प्रास्ताविक म्हणजे राष्ट्राच्या ध्येय धोरणांचा जाहीरनामाच होय. त्यात उद्धृत केलेली तत्त्वे ही आपल्या संस्कृती श्रेष्ठ मूल्य ठरतात. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही तत्त्वत्रयी रूसोने जगाला दिलेली देणगी म्हटली जाते. मात्र ही तत्त्वे याच भूमीतील आहेत. ती साधरणतः 2500 वर्षांपूर्वी तथागत बुद्धाने उद्‌धृत केली. परंतु पुष्पमित्र शुंगाच्या प्रतिक्रांतीने ही तत्त्वे हद्दपार झालीत. युरोपात ती सुप्तावस्थेत तग धरून राहीलीत आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या निमित्ताने पुन्हा वर आलीत. ही तत्त्वे पाश्चात्य तत्वज्ञान म्हणून आपण स्वीकारलीत, एवढेच ! या तत्त्वांचा स्वीकार आपल्या संविधानाच्या प्रास्ताविकात केला आहे. या तत्त्वांबरोबरच राष्ट्राचे सार्वभौमत्व, प्रजासत्ताक राज्यपद्धती हा संविधानाचा पाया ठरवून समाजवाद आणि निधर्मी प्रजासत्ताक निर्माण करण्याच्या उद्देश प्रास्ताविकातून व्यक्त केला आहे.[1] तसेच मानवी मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याचा विश्वास जनतेला दिला आहे.

सर्वात मोठ्या सांस्कृतीकदृष्ट्या महान असलेल्या या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे समान वाटेकरी असण्यावर संविधनकर्त्यांची श्रद्धा होती. म्हणूनच त्यांनी संविधानाच्या सरनाम्यातच एक मत, एक मूल्य ह्या मूलभूत अधिकारांची नोंद केली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान

संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमीका फार महत्त्वाची आहे. वास्तविक संविधनाचा मसुदा लिहिण्यासाठी सात सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. मात्र सहा सदस्यांनी या कार्यात कोणतीही प्रत्यक्ष भूमिका बजावली नाही. म्हणून मसूदा लिहीण्याची जबाबदारी ही पूर्णतः बाबासाहेबांवरच येवून पडली आणि ती त्यांनी समर्थपणे पार पाडली. या सदस्यांमध्ये दुर्दैवाने एकाचा मृत्यू झाला तर एकाने आधीच राजीनामा पाठवून आपली असमर्थता दाखविली. तिसरा सदस्य हा अमेरिकेत निघून गेला. चौथा सदस्य हा राजकारणी असल्यामुळे त्यानेही संविधानाच्या कामाकडे दुर्लक्ष केले. तर दोन सदस्य संविधान सभांना कधीही हजर राहिले नाहीत. त्यांच्याऐवजी इतर दुसऱ्या कोणाची पर्यायी व्यवस्थाही झाली नाही. स्वाभाविकपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले पांडीत्यपणाला लावून महत् प्रयासाने संविधान लिखाणाचे कार्य पूर्णत्वास नेले. मात्र त्यांचे मोठेपण समजून घेण्याचा उदात्तपणा दाखविला जात नाही त्याला कारण जात ! जात ही विषारी अंधश्रद्धा आहे. केवळ एका विशिष्ट जातीत जन्म घेतला म्हणून त्याचे पाय धुतलेले पाणीसुद्धा तीर्थ बनते तर कनिष्ठ जातीत जन्माला आला म्हणून तो कितीही प्रज्ञावंत असला तरी त्याच्या साध्या स्पर्शानेही विटाळ होतो असे प्रारब्ध जोपासले जात होते. शंकराजी करपात्री बाबासाहेबांचा हा मोठेपणा व्यक्त करतांनाही व्यथापूर्ण मनाचा कमकुवतपणा दाखवितांना म्हणतात की, आमची घटना ही अत्युत्तम असली तरी तिच्यात एक दोष आहे, तो म्हणजे तिचा निर्माता एक अस्पृश्य आहे. या मनोवृत्तीस काय म्हणावे ? वास्तविक सात सदस्य संविधान सभेमध्ये असतांना एकट्या बाबासाहेबांनीच 18 ते 20 तास श्रम घेतले. संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये बाबासाहेब, स्टेनो – टायपिस्ट आणि त्यांचा आवडता कुत्रा हे तीनच जीवन दिसायचे. त्यांच्या या अथक परिश्रमांची नोंद

डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीही घेतली आहे.

लहानपणापासून त्यांना जातीभेदाचे चटके सहन करावे लागलेत. ह्या अपमानामुळे घायाळ झालेल्या बाबासाहेबांनी मानवमुक्तीसाठीचा लढा दिला. त्याकरिता त्यांनी धर्म व धर्मग्रंथाच्या मुळावरच घाव घातला. समाज हा कर्मकांड, विभूतीपूजा, शब्द व ग्रंथ प्रमाण्य, रूढीःपरंपरा, धर्माचे स्तोम यातून मुक्त होवून तो सर्वार्थाने निर्भय व विज्ञाननिष्ठ बनावा, त्याला मानवतेच्या अस्मितेची जाणीव व्हावी ह्या व्यापक उद्दिष्टाभेवतीच बाबांचे सर्व लढे केंद्रीभूत झाले होते. विभूती पूजेच्या प्रवृत्तीपासूनच आपल्या सर्वात मोठ्या लोकशाहीला धेका असल्याचे त्यांनी घटनापरिषदेच्या भाषणतून सुतोवाच केले होते. म्हणूनच मूर्तीपूजत नसलेल्या बाबासाहेबांचा मूर्तीभंजनेवरच विश्वास होता.

### *भारतीय संविधान*

आपल्या देशाचे संविधान हे भारतीयांनीच करावे अशी मागणी महात्मा गांधींनी 1922 पासूनच लावून धरली होती. पंतप्रधान मेजर ॲटली यांनी मार्च 1946 मध्ये स्वातंत्र्य देण्याचे धोरणे जाहीर करून आपल्या मंत्रीमंडळातील लॉरेन्स, क्रिप्स, अलेक्झांडर या तीन मंत्र्यांचे शिष्टमंडळ पाठविले. याच त्रिमंत्री योजनेत राष्ट्रीय सभेच्या मागणीचा विचार होवून संविधान निर्मितीचा भारतीयांचा हक्क मान्य केला. याचवर्षी डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली हिंदींचे प्रतिनिधीत्व करणारी घटना समिती स्थापन करण्यात आली. संविधानात्मक पांडीत्य असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली मसूदा समितीची स्थापना झाली. या समितीने तयार केलेला मसूदा 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारण्यात आला तर 26 जानेवारी 1650 पासून नव्या संविधानास राज्यकारभारास प्रारंभ झाला.[2]

### *संविधानाची वैशिष्ट्ये*

#### *1) जगातील मोठे संविधान*

आपले संविधान हे जगात सर्वात मोठे मानले जाते. त्यात 195 कलमे आणि 8 परिशिष्टांचा समावेश आहे. त्यात राज्य आणि केंद्रसरकारांच्या रचना आणि अधिकार, मानवी मूलभूत हक्क, राष्ट्रपतींचे अधिकार, 3 मागासवर्गीयांच्या हितसंवर्धनासाठीच्या खास तरतूदी अशा अनेकविध बाबींवर स्पष्ट आणि सविस्तरपणे चर्चा करण्यात आली आहे. यामुळेच आपल्या संविधानाची पायाभूत चौकट मजबूत बनली आहे.

#### *2) लिखित स्वरूपाचे संविधान*

आपल्या संविधानाचे स्वरूप लिखीत आहे. सूर्यास्त होत नसलेल्या प्रचंड आणि विस्तारीत साम्राज्य असलेल्या इंग्लंडची राज्यघटनासुद्धा लिखीत स्वरूपात नाही. असे असले तरी जगातील सर्व घटनांचा अभ्यास आपल्या घटनातज्ज्ञांनी केला. घटनापरिषदेच्या चर्चेअंती भारतीय समाजाला उपकारक ठरेल अशी घटना तयार करण्यात आली आहे. लिखीत स्वरूपाकरिताच घटना परिषदेत साधरणतः तीन वर्षापर्यंत एकूण 11 सत्रांमध्ये कामकाज चालले. तेंव्हा जगातील सर्वात मोठे आणि लिखीत स्वरूपाचे संविधान साकार झाले. तरीही शेवटच्या सत्राचे कामकाज 113 दिवसांपर्यंत चालून प्रस्तावित मसूदामध्ये महत्त्वपूर्ण बदल करून अंतीम स्वरूप प्राप्त झाले.

#### *3) सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक*

संविधानाच्या प्रास्ताविकेत प्रारंभीच आपले राष्ट्र हे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक बनले असल्याची घोषणा केली आहे. हे वैशिष्ट्ये म्हणजे भारतीय समाजाच्या सर्वकष गुलामगिरीच्या विमोचनाचे द्योतकच होते. कारण हा समाज प्राचीन आणि मध्यकाळात राजेशाहीच्या तर आधुनिक काळात परकीय साम्राज्यशाहीच्या दास्यत्वात अडकला होता. शारीरिक, आर्थिक, मानसिक शोषणाचा बळी ठरत होता. या पार्श्वभूमीवर आता हा समाज आणि राष्ट्र कोणत्याही सत्तेखाली राहीले नसून म्हणजे हे राष्ट्र असे दास्यत्व लादणारी कोणतीही सत्ता स्वीकारीत नसून ते सार्वभौम बनले आहे.[4] खरी सत्ता ही जनतेमध्ये सामावलेली आहे. म्हणजेच भारतीय राज्य हे लोकशाही प्रदान आहे. कारण राज्यकारभार जरी मंत्रीमंडळामार्फत चालविला जात असला तरी त्यांना जनतेने निवडून दिलेले असल्यामुळे ते जनतेला जबाबदार राहून जनतेच्या सार्वभौमत्वाचा आदर राखतात हे महत्त्वाचे होय. तसेच आता कोणीही राजघराण्याची सत्ता वंश परंपरेने चालत नसून लोकनियुक्त अध्यक्षांकडून चालविली जाते, म्हणजे भारत हे राष्ट्र प्रजासत्ताक बनले आहे.

#### *4) संसदीय राज्यपद्धतीचा स्वीकार*

संविधानाद्वारे आपण संसदीय राज्यपद्धतीचा स्वीकार केला आहे. केंद्रामध्ये राष्ट्रपती आणि राज्यांमध्ये

राज्यपाल हे जरी घटनात्मक प्रमुख म्हणून राज्यकारभार पाहत असले तरी खऱ्या अर्थाने केंद्रात आणि राज्यात लोकनियुक्त मंत्रीमंडळामार्फतच कारभार चालविला जातो. सत्ता मंत्रीमंडळाच्याच हातात असते आणि मंत्रीमंडळ कायदे मंडळाला म्हणजेच लोकांनाच जबाबदार असते.

### *5) उत्तमोत्तम कलमांचा स्वीकार*

घटनातज्ज्ञांनी जगातील सर्व राज्यघटनांचा सखोल अभ्यास करून भारतीय व्यवस्थेला पूरक अशा उत्तमत्तम कलमांचा स्वीकार केला आहे. कारण आपल्या संविधानाचा सांगाडा इंग्लंडच्या घटनेशी निगडीत आहे. तर मानवी मूलभूत हक्क[5] व सुप्रीम कोर्टाच्या अधिकारांवर अमेरिकन राज्यघटनेचा प्रभाव पडलेला आहे. याचप्रमाणे इतर युरोपियन घटनांमधूनही काही मार्गदर्शक तत्त्वांचा अंगीकार आपल्या संविधानकर्त्यांनी केलेला आहे.

### *6) धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार*

आपल्या संविधानाचे धर्मनिरपेक्षता किंवा धर्मातील राज्ये हे वैशिष्ट्यपूर्ण असेच आहे. या देशात अनेक धर्म व पंथ आहेत. देशात बहुसंख्य हिंदू धर्मीय असले तरी हा देश सर्वधर्मियांचा आहे. हिंदूबरोबर, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, शिख इत्यादी सर्व धर्मियांचाही हा देश आहे.[6] या सूत्रास धरून संविधानाने या देशातील प्रत्येक नागरिकास धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले आहे. संविधानाच्या तटस्थ वृत्तीमुळेच या देशातील कोणताही बहुसंख्य प्रजा असलेला धर्म राष्ट्रधर्म बनला नाही किंवा अल्पसंख्य असलल्या धर्मावर कोणताही अन्याय झाला नाही. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वत्रयीचा पाया असलेले आपले संविधान भारतीय समाजाला धर्मनिरपेक्षतेचा निर्देश देते. म्हणून आपल्या संघराज्याची निर्मिती ही धर्मनिष्ठतेऐवजी राष्ट्रनिष्ठेच्या आधरावरच झालेली आहे.

### *7) लोककल्याण*

हे महत्त्वाचे उद्दिष्ट आपल्या संविधानाने स्वीकारलेले आहे. घटना तज्ज्ञांसमोर तथागत गौतम बुद्धाच्या शिकवणुकीतील मानवी मूलभूत हक्कांची तत्त्वे होती. स्वातंत्र्य[7]

### *संदर्भसूची –*

1.के. सागर व व्ही. बी. पाटील, भारताची राज्यघटना, के. सागर, पुणे, 2010, पृ. 45–46.
2.पवार जयसिंगराव, अर्वाचीन भारताचा आणि चीनचा इतिहास, मंजुश्री प्रकाशन, कोल्हापूर, मे–1995, पृ.251.
3.आंबेडकर डॉ. भिमराव, संविधान, भारत सरकार विधि और न्याय मंत्रालय, नई दिल्ली, 2011, पृ. 157.
4.दशरथे अनंत, भारतीय संविधान रचना व शास्त्र, परिमन प्रकाशन, पुणे, 1998, पृ. 80.
5.तुंटे विजय, नेरकर संदीप, भारतीय संविधान, भाग–1, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 2013, पृ.39.
6.कुलकर्णी पी. के., मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणें, 2013.
7.जैन एम. एन., भारतीय संविधानिक विधि, पंचशिल प्रकाशन, जयपूर, 1987, पृ. 120.



***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net